प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

संक्षिप्त



## क्रिकहिल फाउंडेशन- प्रतिभा महाविद्यालयात सायबर जनजागृतीविषयक प्रकल्प करार

**पिंपरी :** चिंचवड येथील कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या प्रेरणेने क्रिकहिल फाउंडेशन तसेच प्रतिभा महाविद्यालय यांच्यामध्ये सायबर जनजागृतीविषयक प्रकल्पाचा करार करण्यात आला. सायबर सुरक्षा हे आजच्या काळातील एक अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांची संख्यादेखील वाढत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा हा प्रत्येक नागरिकासाठी अत्यावश्यक विषय बनला आहे. या प्रकल्पाद्वारे नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे उपाय शिकवले जातील. याअंतर्गत विविध कार्यशाळा, सेमिनार आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. महाविद्यालयातील प्रथम तसेच द्वितीय वर्षाचे विद्यार्थी या प्रकल्पाद्वारे परिसरातील विविध शाळा, महाविद्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर गुन्हे आणि उपाययोजना यांबद्दल माहिती देण्यासाठी स्वतंत्र सायबरक्लबची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने दिपू सिंह, बतूल परावाला, संकेत पवार तसेचऑलिव्ह विजू या विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड करण्यात आली. त्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुणकुमार वाळूंज, मुख्यप्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया आदींनी मार्गदर्शन केले.